पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्रमांक ९

दिनांक: १७/१२/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

----------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१४ ची मासिक सभा बुधवार दिनांक १७/१२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा. सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे - सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा.श्री.उल्हास शेट्टी
४. मा. भारती फरांदे
५. मा. आर.एस. कुमार
६. मा. जावेद रमजान शेख
७. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
८. मा. पांढरकर निलेश शंकरराव
९. मा. नंदा विकास ताकवणे
१०. मा.नेटके सुमन राजें राजेंद्र
११. मा. तरस बाळासाहेब जयवंत
१२. मा. प्रसाद शेट्टी
१३. मा.सौ. काळभोर वैशाली जालिंदर
१४. मा.सौ. साळुंके सविता सुरेश

याशिवाय श्री. डॉ.महेशकुमार डोईफोडे-क्षेत्रीय अधिकारी, श्री. शेख फारुख, - कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.मिलींद कपिले - कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री. प्रदिप पुजारी - उपअभियंता – स्थापत्य/ झोनिपु, श्री.पी.एस.ओंभासे-उपअभियंता बीआरटीएस, श्री.सुनिल वाघुंडे, श्री.संजय भोसले, श्री.वैभव पुसाळकर - उपअभियंता स्थापत्य, श्रीम.लता बाबर - उपअभियंता विद्युत, श्रीम.झेड.मोमिन - उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.पांडूरंग जाधव-लेखाधिकारी, श्री.के.डी.दरवडे-सहा.आरोग्याधिकारी, श्री.पी.यू.गायकवाड - उद्यान अधिक्षक, श्री.कुंभार पी.यू. – उद्यान पर्यवेक्षक (हॉर्टी.), एस.एस.वहीकर- कनिष्ठ अभियंता वाहतुक, श्री.पाटील एस.बी. - कनिष्ठ अभियंता झोनिपु, श्री.शितोळे एस.के. कनिष्ठ अभियंता स्थापत्य, श्रीम.मोमीन झेड.आय.- मुख्याध्यापक उर्दू हायस्कूल, आर.जी.जाधव- स.शिक्षक/ समन्वयक- माध्यमिक विद्यालय काळभोरनगर इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

विषय क्र. २ मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेनुसार
सन २०१४-१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रक छपाईकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र. ३ श्री.बाबासाहेब देवराम ढसाळ यांचे पत्र दिनांक १०/१२/२०१४
महापालिका मुख्यालयातील विस्तारित पत्रकार कक्षास नाव देणेबाबत.

विषय क्र. ४ मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव
देहुरोड कॉन्टोमेंट हद्दीत नळ कनेक्शन देणेबाबत.

विषय क्र. ५ मा. शारदा प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव
चौकाचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ६ मा.श्री.निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव
नाल्याच्या बाजूला तारेची जाळी बसविणेबाबत.

विषय क्र. ७ मा.श्री.निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र. १६ आकुर्डी मधील पांढरकर व गंगाई उद्यानाच्या कमानीची रंगरंगोटी करणे, पक्की सिमाभिंत बांधणे व प्रकाश व्यवस्था करणेबाबत.

विषय क्र. ८ मा.श्री.निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र. १६ मधील स्वच्छतागृहाची दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्र. ९ मा.श्री.निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र. १६ मधील हनुमान मंदिर परिसरात रंगित पेव्हींग ब्लॉक बसविणे, पत्राशेडचे सिमेंट स्लॅपमध्ये रुपांतर करणे व मुतारीसाठी पाण्याची टाकी बसविणेबाबत.

विषय क्र.१०. मा.श्री.निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र. १६ ठिकठिकाणी रोड डिव्हायडर बसविणेबाबत.

| | |
|---|---|
| विषय क्र.११ | मा.श्री.निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्र. १६ मधील आकुर्डी व गंगानगर परिसरात नागरीकांसाठी सुचनाफलक लावणेबाबत. |
| विषय क्र.१२ | मा.श्री.मोरेश्वर महादु भोंडवे यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक १९ मधील रस्ते व चौकांना नावे देणेबाबत. |
| विषय क्र.१३ | मा.सौ. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक २६ मधील पदपथाचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्र.१४ | मा.सौ. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील पदपथाचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्र.१५ | मा.सौ. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव<br>नादुरुस्त मुतारी पाडून नवीन मुतारी करणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४८ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : बीआरटीएस |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. उल्हास शेट्टी |

संदर्भ: मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
स्था/बीआरटीएस/६३६/२०१४ दिनांक ०९/१२/२०१४
मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

भक्ती-शक्ती चौक निगडी ते मुकाई चौक किवळे हा ४५ मिटर रस्ता विकसित करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. रेल्वे उड्डाणपूल ते भक्ती-शक्ती चौक पर्यंतचा रस्ता विकसित करण्याचे काम निविदा नोटीस क्रमांक १०/१-२०१४-१५ अन्वये ठेकेदारास दिलेले असून प्रत्यक्ष कामास सुरुवात करणेत येणार आहे. या कामांतर्गत चेनेज ४३०० अप्पू घर नजिक महापालिका कर्मचारी निवास स्थानाची (३७०.७४चौ.मि.क्षेत्रफळाची) एकूण आठ सदनिका असलेली इमारत रस्तारूंदीने बाधीत होत आहे. सदर इमारतीमध्ये एकूण ७ कर्मचारी राहत असून १ सदनिका रिकामी आहे. इमारतीमधील कर्मचा-यांची निवास व्यवस्था व स्थलांतरण इ.बाबत मा.सहा.आयुक्त, भूमि-जिंदगी यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

इमारतीमधील कर्मचा-यांची निवास व्यवस्था व स्थलांतरण इ.बाबतची कार्यवाही पूर्ण

झालेनंतर मनपा कर्मचारी निवासस्थानाची इमारत पाडणेत यावी, यास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ४९ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : लेखा |
| सुचक | : मा. जावेद शेख | अनुमोदक | : मा. नंदा विकास ताकवणे |

संदर्भ: मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
अक्षेका/नि/कावि/२९१/२०१४ दिनांक १७/१२/२०१४
मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१४-१५ चे सुधारित व सन २०१५-१६ चे मूळ अंदाजपत्रक तयार करुन प्रभाग समितीपुढे सादर करावयाचे आहे. त्याकामी अंदाजे २०० पानाचे एक या प्रमाणे ४० अंदाजपत्रक पुस्तकाच्या प्रतीची छपाई करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे ४०,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रक पुस्तकाची तातडीची बाब म्हणून कोटेशन पध्दतीने दर मागवून करारनामा न करता छपाई करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५० | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. साळुंके सविता सुरेश | अनुमोदक | : मा. प्रसाद शेट्टी |

संदर्भ: श्री.बाळासाहेब ढसाळ, अध्यक्ष पिंपरी चिंचवड पत्रकार संघ यांचे पत्र
दिनांक १०/१२/२०१४
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत तिसऱ्या मजल्यावर सारथी कार्यालयाच्या बाजूला असलेल्या पत्रकार कक्षास “जेष्ठ पत्रकार भा.वि.कांबळे कक्ष” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५१ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : पाणीपुरवठा |
| सुचक | : मा. आर.एस.कुमार | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव.

ट्रान्सपोर्टनगरी सेक्टर २३ लगत (देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीत) असलेल्या “दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टेड अकांटन्ट ऑफ इंडिया” या कार्यालयास सध्य स्थितीत पिण्याचे पाण्याचा नळ नाही. सदर इन्स्टिट्यूट ने पाण्याचे नळ मिळणेकामी विनंती केलेली आहे. पिण्याचे पाणी ही अत्यंत महत्वाची बाब असलेने त्यांना नळकनेक्शन देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय अ प्रभाग समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे पाठविण्याची शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५२ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. शारदा प्रकाश बाबर | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: मा.शारदा प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव.

थरमॅक्स चौकातून भोसरीकडे जाणाऱ्या मार्गावर एच.डी.एफ.सी. कॉलनी समोरील चौकास “बर्डव्हॅली चौक” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५३ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश शंकरराव पांढरकर | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाण मधील नाल्याच्या सिमाभिंतीवर जाळी बसविणे.

१) सुदर्शननगर ते आकुर्डी मैलाशुध्दीकरण केंद्रापर्यंतचा नाला

२) गणेशनगरी ते सिमा सोसायटी पर्यंतचा नाला

वरील ठिकाणी नाल्याच्या सिमाभिंतीस दोन्ही बाजूने जाळी बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५४ | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश शंकरराव पांढरकर | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाण मधील पांढरकर उद्यान व गंगाई उद्यानाचे कमानीची रंगरंगोटी करणे, प्रकाश व्यवस्था करणे व गंगाई उद्यानास पक्की सिमाभिंत बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५५ | विषय क्रमांक | : ८ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश शंकरराव पांढरकर | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाण मधील सर्व स्वच्छतागृहाची पाहणी करुन तुटलेली दारे नवीन बसविणे, फुटलेले भांडे नवीन बसविणे व आवश्यक ठिकाणी पाण्याच्या टाकीची व्यवस्था करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५६ | विषय क्रमांक | : ९ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश शंकरराव पांढरकर | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाणतील गंगानगर येथील हनुमान मंदिराच्या परिसरामध्ये रंगीत पेव्हींग ब्लॉक बसविणे, आकुर्डी गाव मुख्य रस्त्यालगत असलेल्या हनुमान, गणपती व विठ्ठल-

रुक्मीणी मंदिर परिसरात सुशोभीकरणासाठी रंगीत पेव्हींग ब्लॉक बसविणे, पत्रा शेडचे सिमेंट स्लॅबमध्ये रुपांतर करणे व तेथील मुतारीसाठी पाण्याची टाकी बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५७ | विषय क्रमांक | : १० |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश शंकरराव पांढरकर | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ आकुर्डी गावठाण मध्ये रोड डिव्हायडर बसविणे

१. श्री.खंडोबा चौक ते शितळादेवी चौक ते सुदर्शननगर नाल्यापर्यंत
२. गणेशनगरी ते म्हाळसाकांत चौक
३. म्हाळसाकांत चौक ते गंगानगर रेल्वे लाईन लगतच्या रस्त्यापर्यंत
४. गंगानगर रेल्वे लाईन लगतचा रस्ता ते सुभाष पांढरकर नगर पर्यंत

वरील रस्त्यांवर रोड डिव्हायडर बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५८ | विषय क्रमांक | : ११ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. निलेश शंकरराव पांढरकर | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. निलेश शंकरराव पांढरकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ मधील आकुर्डी व गंगानगर परिसरातील नाल्यामध्ये कचरा टाकू नये असे फलक लावणेस व जेथे कचरा कुंड्या ठेवल्या आहेत त्या शेजारी कचरा कुंडीतच टाका अस फलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ५९ | विषय क्रमांक | : १२ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. बाळासाहेब तरस | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. मोरेश्वर महादु भोंडवे यांचे दिनांक १७/१२/२०१४ रोजीचे पत्र

प्रभाग क्रमांक १९ मधील वाल्हेकरवाडी परिसरामधील रस्त्यांचे नामकरणाबाबत.

१. सेलेस्टीयल सिटी मागे सर्व्हे नं. ७७ मधील रस्त्यास "संतोष दत्तात्रय भोंडवे मार्ग"
२. शिंदेवस्ती रावेत पासून डी मार्टकडे जाणा-यास "कै.चंद्रभागा महादु भोंडवे मार्ग"
३. शिंदेवस्ती MIDC रोड सोनटक्के वस्तीच्या कडेने उजव्या साईडला जाणाऱ्या रस्त्यास "कै.महादु हरी भोंडवे पथ"
४. वाल्हेकरवाडी भोंडवे वस्तीकडे जाणा-या रस्त्यास "कै.बबीबाई विनायक शिंदे मार्ग"

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६० | विषय क्रमांक | : १३ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.वैशाली जालिंदर काळभोर | अनुमोदक | : मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव |

संदर्भ: मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर येथील प्रभूचेंबर्स सोसायटी ते श्री गणेश प्रसारक ट्रस्ट या पदपथास "कै.सौ.सुमन अविनाश काळभोर मार्ग" असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६१ | विषय क्रमांक | : १४ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा.वैशाली जालिंदर काळभोर | अनुमोदक | : मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव |

संदर्भ: मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील कृष्णा पार्क सोसायटी ते काळभोर निवास या पदपथास "कै.सावळेराम खंडूजी काळभोर पथ" असे नाव देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६२ | विषय क्रमांक | : १५ |
| दिनांक | : १७/१२/२०१४ | विभाग | : झोनिपु स्थापत्य |
| सुचक | : मा.वैशाली जालिंदर काळभोर | अनुमोदक | : मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव |

संदर्भ: मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २६ काळभोरनगर मधील खडी मशीन येथील नादुरुस्त (पडलेली) मुतारी पाडून तेथे नवीन मुतारीचे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे)
सभापती
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
अक्षेका /११/कावि/ ७ /२०१५
दिनांक : ०९ / ०१ /२०१५

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती